# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय,
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोननं ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

**प्रेसनोट क्रमांक :- २९१** **दिनांक :- १८/१०/२०२१**

## <u>अवजड वाहनांमुळे होणारी वाहतूक कोंडी टाळण्यासाठी “ वाहतूक नियंत्रण अधिसुचना’’ जारी.</u>

मुंबई- अहमदाबाद राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ वरील गुजरातकडून ठाणे, नवी मुंबई मार्गे जे.एन.पी.टी. कडे जाणारी अवजड वाहनांच्या वाहतूकीमुळे ठाणे शहरात मोठया प्रमाणावर वाहतूक कोंडी होऊन सर्व सामान्य जनतेची मोठया प्रमाणात गैरसोय होत आहे. याकरीता मुंबई- अहमदाबाद राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ वरुन गुजरातकडून मुंबई तसेच ठाणे मार्गे नवी मुंबई व जे.एन.पी.टी. कडे जाणारी अवजड मालाची वाहतूक करणा-या वाहनांच्या वाहतूकीकरिता जिल्हा दंडाधिकारी पालघर यांनी अधिसुचना निर्गमीत केलेली आहे.

त्यामुळे मिराभाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालयात अवजड वाहनांची वाहतूक आजूबाजूच्या शहरांच्या अधिसूचनेमधील वेळेशी मिळतीजूळती ठेवने आवश्यक झाल्याने अवजड वाहनांच्या वाहतूकीच्या वेळा सुनिश्चित करुन अवजड वाहनांची वाहतूक व्यवस्था सूरळीत ठेवण्यासाठी श्री अमित काळे, पोलीस उप आयुक्त परिमंडळ-१, मिरारोड, अतिरिक्त कार्यभार पोलीस उप आयुक्त (मुख्यालय) मिरा-भाईंदर, वसई-विरार यांनी वाहतूक अधिसूचना जारी केलेली असून अवजड वाहनांच्या वाहतूकीबाबत सुचना पुढिलप्रमाणे असणार आहे.

### <u>वाहतूकीकरीता सुरु व बंद करण्यात येणारा मार्ग व कालावधी</u>

मुंबई- अहमदाबाद राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ वरुन गुजरात कडून मुंबई व ठाणे मार्गे नवी मुंबई, जेएनपीटीकडे जाणारी अवजड वाहनांची वाहतूक रात्री २२.०० वा. पासून पहाटे ०४.०० वा. पर्यंत व दुपारी ११.०० वा. ते १५.०० वा. पर्यंत सूरु राहील.

तसेच सकाळी ०४.०० वा. ते ११.०० वा. पर्यंत व सायंकाळी १५.०० वा. ते २२.०० वा. पर्यंत अवजड वाहनांना पालघर बाजूकडून ठाणे / मुंबई बाजूकडे जाण्यास मनाई करण्यात येत आहे.

सदरची वाहतुक नियंत्रण अधिसूचना ही मिरा-भाईंदर वसई- विरार पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत येणारी अत्यावश्यक सेवेतील वाहने, पोलीस वाहने, महसूल विभागाची वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहीका, पोलीसांनी परवानगी दिलेली वाहने, जिल्हा दंडाधिकारी मुबई, ठाणे, पालघर व मनपा आयुक्त मुंबई, ठाणे, मिरा-भाईंदर, वसई-विरार, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकारण यांनी परवानगी दिलेल्या वाहनांना लागू राहणार नाही.

सदरची वाहतुक नियंत्रण अधिूचना दि. १८/१०/२०२१ रोजी सकाळी ०७.०० वा. पासून ते दि. १६/११/२०२१ रोजी सायंकाळी १८.०० वा. पर्यंत अंमलात असणार आहे.

---ooo---